प्रकरण चौथे

# ‘तुकयाची आवली’ च्या व्यक्तिरेखेचे स्वरूप

प्रकरण चौथै

# 'तुकयाची आवली' मधील व्यक्तिरेखेचे स्वरूप

मागील प्रकरणांमध्ये मंजुश्री गोखले यांच्या 'तुकयाची आवली' या कादंबरीचा आशय पाहिला. प्रस्तुत प्रकरणात कादंबरीतील आवली व इतर व्यक्तिरेखेंचे वैशिष्ट्ये पहावयाचे आहे.

मानवी जीवनाचे कुतूहल असणारा लेखक अनुभवांचे चित्रण करीत असतो. तो त्यांच्या मानसिक प्रक्रियेतून विविध व्यक्तिंचे नमुना साकारात असतो. त्यात काही अंतर्मुख स्वरूपाच्या व्यक्तिरेखा असतात. या संदर्भात डॉ. बाबुराव उपाध्ये म्हणतात, ''साहित्य कृतीत विविध पद्धतीने, विविध प्रकारात, विविध भावानुभवांचे ज्या व्यक्तिंवर आरोपण केले जाते त्या व्यक्तिंना व्यक्तिरेखा असे म्हणतात.''[१]

वाङ्मयातील व्यक्तिंच्या स्वभावावर, गुणवैशिष्ट्यांवर प्रकाश टाकणे म्हणजे त्या व्यक्तिंचे दर्शन घडविणे होय. त्या व्यक्तिंचा राग, लोभ, हर्ष, खेद या भावना यात येतात.

''साहित्यिक व्यक्तिंच्या स्वभावातील विविध छटा तो प्रतिभेच्या साहाय्याने निर्माण करीत असतो. निरनिराळ्या प्रसंगी पात्रांच्या भावना काय असतील याचा अंदाज लेखक घेत असतो''[२] या दृष्टिने संत साहित्याच्या पार्श्वभूमीवर 'आवली' च्या व्यक्तिरेखेचे वैविध्यपूर्ण स्वभाव वैशिष्ट्ये अभ्यासता येतील.

कादंबरीत बालपणी सालस, मनस्वी, हट्टी, स्वाभिमानी असणारी आवली विवाहाने कर्तव्य आणि जबाबदारीमुळे प्रौढ झालेली दिसते. प्रत्येक समस्येवर तोडगा काढताना दिसते. माणकूने काळी आहे म्हणून टाकलेल्या सईचा स्वीकार करावा, म्हणून प्रयत्न करताना दिसते. त्यासाठी आवली बोल्होबांना म्हणते, ''माणकूला मी दोन गोष्टी बोलून बघू का? ''[३] यावरून तिच्या स्वभावातील नम्रता व मर्यादाशीलता हा गुण दिसून येतो.

विवाहानंतर आवली-तुकारामांच्या जीनात सुखाचे दिवस थोडेच आलेले आहेत. त्यांच्या जीवनात संकटे हातात हात घालून येताना दिसतात. बोल्होबा-कनकाईचा मृत्यू, सावजीचे परागंदा होणे, त्यांच्या पत्नीचा मृत्यू, महाराष्ट्रात पडलेला दुष्काळ, तुकारामांच्या पत्नीचा दम्याच्या विकाराने मृत्यू, दुष्काळाचा बळी ठरलेल्या संताजीचा मृत्यू. यामुळे ती

सैरभैर होते. चौदा ते पंधरा वर्षांच्या पोरवयात तिचे सर्व आधार एका पाठोपाठ निघून जातात. उपरोक्त घटनांनी पुरते खचलेले, घायाळ, हतबल झालेले तुकाराम पाहून ती संकटाशी दोन हात करताना दिसते. ती स्वत:च्या आधार स्वत:च बनून संकटाचा अंधार निपटून काढणारी आहे.

तुकारामांवर, घरातल्या सगळ्या माणसांच्यावर प्रेम करणारी, त्यांच्या सुखासाठी अहोरात्र झटणारी आहे. माहेरची श्रीमंत असली तरी परिस्थितीपुढं नमतं घेणं तिचा स्वभाव नाही. ती स्वाभिमानी आहे. विश्वास गमावलेली, प्रयत्न न करता परिस्थितीला शरण जाऊन परमेश्वराचा धावा करत बसण्याविषयी तिला आत्यंतिक चीड आहे. तिचा प्रयत्नावर फार मोठा विश्वास आहे. म्हणूनच तुकारामांचे हतबल होणे, देवाला साकडे घालणे, त्यांच्या नाकर्तेपणाला, थंडपणाला ती बोल लावताना दिसते. ती झुंजार वृत्तीची आहे. आपल्या नवऱ्याच्या अशा स्वभावाला कारणीभूत ठरलेल्या विठ्ठलाला ती मानवी रूपात व्यक्त करून शिव्याही देताना दिसते.

लालजी सावकार वाड्यावर जप्ती आणतो. तेव्हा ती आपल्या संसारावरील प्रेमाखातर तुकारामांना वाडा वाचविण्यास विनंती करते. पण तुकारामांनी सावकाराच्या मदतीची, कृतज्ञतेची जाणीव करून देताच ती पतीची आज्ञा शिरोधार्ह मानून मनातील वेदना आणि डोळ्यातील अश्रुसह तुकारामांच्या पाठोपाठ फरफटत जाताना दिसते.

शिवाजी महाराज व तुकाराम यांच्या भेटीतील प्रसंगात शिवाजी महाराज तुकारामांच्या कुटुंबासाठी नजराणा आणतात. पण तुकाराम तो नजराणा नम्रपणे परत करून त्याचा उपयोग राज्य रक्षणासाठी आणि रयतेच्या कल्याणासाठी करण्यास सांगतात. त्यावेळी आवली ही दुजोरा देताना दिसते ती म्हणते, ''राजे, पतीची इच्छा हेच पत्नीचे दागिने, पतीचं आज्ञापालन हेच शालू-शेले, आणि पतीची इच्छापूर्ती आणि सेवा हेच तिचं धन. आम्हाला त्याचं मोल जास्त आहे. तुम्हीच आम्हाला माफ करा. तुम्ही दिलेला नजराणा आम्ही स्वीकारू शकत नाही'' [४]

यावरून आवलीची विनयशीलता व आज्ञाधारकपणा दिसून येतो. एकीकडे जीवनसंघर्षात टिकून राहण्यासाठी चाललेले प्रयत्न आणि दुसरीकडे तिच्या वाट्याला सतत येणारे प्रमाणाबाहेर अपयश यामुळे तिचा स्वभाव व्यामिश्र बनत गेलेला दिसतो. ती कधी

परखडपणे कठोर बोलते.तर कधी प्रेमळ कृतज्ञता व्यक्त करताना दिसते. वाड्यावरील जप्ती नंतर गावाने केलेल्या मदतीमुळे ती गावाविषयीची व आपले पती, सासू, सासरे यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करताना विठ्ठलाला परखडपणे म्हणते, ''काळ्या तुला काय वाटलं, हे सगळं तुझ्यामुळं झालयं? ही सगळी तुझी कृपा आहे? अरे गतकाळ्या हे माझ्या नवऱ्याचं कर्तृत्व आहे. माझ्या सासू-सासऱ्याची पुण्याई आहे. माझ्या नवऱ्यावरचं गावाच हे प्रेम आहे. भले माझ्या नवऱ्यानं माझा संसार केला नसेल,पण त्यांनी सगळ्या गावाचा संसार केलाय. माझ्या पोराबाळांची, माझी काळजी केली नसेल पण साऱ्या गावाची काळजी केलीय. त्याचच हे फळ आहे. तू नको करू तू काय हे सगळं करणार? तोंड बघ. नुसत कमरेवर हात ठेऊन उभं राहण्याशिवाय तुला येतयं काय? माझा नवरा अधीच खुळा त्यात तुझ्या या असल्या हसण्यानं आणीच खुळावलाय. तू बस हसत त्याला घेऊन. मला पोरांच्या तोंडात चार घास घालायचे आहेत. मुडदा, हसतोय नुसता, माकडासारखा''[५]

तुकारामांचे मन विठ्ठलाच्या भक्तीकडे झुकलेले असल्याने ते संसाराकडे लक्ष देत नाहीत. आपले सर्व प्रयत्न निष्फळ आहेत याची जाणीव आवलीला आहे. पण तुकारामांवर तिचे आत्यंतिक प्रेम आहे. ती तुकारामांवर सात्विक संतापातून आपले प्रेम व्यक्त करते. ती त्यांना म्हणते, ''अहो, अहो धनी भाकर आणलीया, घासभर खाऊन घ्या, कालपासनं तुमच्या पोटात काही नाही. उठा खाऊन घ्या.''[६]

आवली कर्तव्यनिष्ठ गृहिणी आहे. ती तुकारामांना गावातच काय तर भामनाथाच्या डोंगरावरही काट्याकुट्यातून शोधत जाते. तुकाराम सापडल्याचा आनंद न दाखवता त्यांच्यावर प्रेमळ संताप व्यक्त करते, ''आता काय म्हणावं या कर्माला? हित येऊन बसलाय व्हय? सगळा गाव पालथा घातला की मी! काय हैक म्हणायचं का हुईक? कुठ गेला होतात सकाळपासून? त्या काळ्याच्या मंदिरात पण जाऊन आले या इथं एवढ्या लांब, डोंगरावर काय म्हणून येऊन बसलाय? पोटात काय अन्न नाही, पाणी नाही? एकटच येऊन बसलाय? सोबत तरी कुणाला तरी आणायचं? इथं या डोंगरावर, या जंगलात असं एकटं दुकट यायला काय येड-बीड लागलय का तुम्हाला जीव उडून गेला माझा''[७]

या सारख्या तिच्या बोलण्यावरून तिचे तुकारामांवरील प्रेम, माया, काळजी निर्दिष्ट होताना दिसते.


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

आवलीचा उल्लेखनीय गुण म्हणजे स्वच्छ, टापटीप व नीटनेटकेपणा होय. लहानपणी व लग्नानंतर दोन्हीकडील सुशील असे संस्कार तिच्यावर झाले असल्याने ती गृहकर्तृत्वदक्ष, संसारी स्त्री बनलेली आहे. माणकूचे घर ती स्वत:च्या घराप्रमाणे टापटीप नीटनेटके ठेवताना दिसते. तर अनेक रंगाच्या कपड्यातून रंगसंगती साधून शिवलेल्या सुंदर नक्षीदार गोधडीतून तिची कलासुकसर प्रत्ययास येते. प्रत्येकवेळी तुकारामांवर मुले, संसार यासाठी करवादणारी आवली अनेकवेळा समजूतदार अशी दिसून येते. तिच्या मनात तुकारामांच्या विषयी आदरभाव, अभिमान आहे. भेटण्यासाठी आलेले आप्पाजी जेव्हा तुकारामांना संसाराविषयी काही समजूतीच्या गोष्टी सांगतात. त्यावेळी आवली खुद्द आप्पाजींची समजूत काढताना दिसते. त्यातून तिच्या मनाचा मोठेपणा व आदरभाव दिसून येतो. ती आप्पाची समजूत काढताना म्हणते.

''नाही नाही आप्पाजी, यात त्यांचा काहीही दोष नाही, एका मागं एक संकट कोसळली त्यानं ते खचले. त्या काळ्या विठ्यानं त्यांना नादी लावलं गारूड केलंन मुडद्यान त्यांच्यावर आप्पाजी आता सगळा गाव त्यांचा आहे आणि हे सगळ्या गावाचे आहेत. आप्पाजी माझे धनी खूप मोठे आहेत. खूप खूप मोठे, पण त्यांच्या पुढं मी आणि माझी मुलं खूपच लहान आहोत. म्हणूनच ते आमच्यापर्यंत पोहचू शकत नाहीत आणि आम्ही त्यांच्यापर्यंत. यात त्यांचा काय दोष? फक्त वाईट एवढच वाटतंय आप्पाजी, की ते सगळ्या गावचे आहेत,पण माझे, माझ्या मुलांचे नाहीत. सगळ्या गावाची उस्तवारी करायला त्यांना वेळ आहे. त्या विठ्याची भजनं गायला, कीर्तन करायला त्यांना वेळ आहे. पण आमच्यासाठी त्यांना वेळ नाही. आप्पाजी तुमचा जावई फार मोठा आहे. पण तुमची मुलगी फार लहान आहे हो. म्हणून ती एकटी पडलीय. आप्पाजी त्यांच्या डोक्यावर दुनियेच्या संसाराची जबाबदारी आहे. मग माझ्या संसाराची, माझ्या मुलांची जबाबदारी ते कुठ घेणार? मग ती मलाच घेतली पाहिजे. झेलली पाहिजे आणि पेलवली नाही तरी पेलली पाहिजे.''[८]

आवलीच्या वरील मनोगतातून आपले लहानपण व तुकारामांचे मोठेपण मोठ्या मनाने मान्य करताना तिच्या मनाचा मोठेपणा दिसून येतो.

आवली जशी मोठ्या मनाची आहे.त्याचप्रमाणे ती बाणेदार वृत्तीचीही दिसून येते. दुष्काळामुळे संसाराची वाताहत झाली. कधीकाळी सधन, श्रीमंत असणाऱ्या तुकारामांच्या

कुटुंबाला दारिद्र्याचे चटके सहन करावे लागले. ज्याना भरभरून सुपाने दिले त्यांच्याकडून पसाभर मागण्याची वेळ त्यांच्या कुटुंबावर येते पण अशाही परीस्थितीत ती माहेरी मदतीसाठी जात नाही. लोकांची मदत असहाय्यपणे घेताना तिला दु:ख होते. यातून तिची बाणेदार वृत्ती दिसून येते.

आप्पाजी आवलीला विसाव्यासाठी दोन दिवस माहेरी नेण्यासाठी तुकारामांकडे परवानगी मागतात. तुकारामही या गोष्टीला परवानगी देतात. पण आवलीला आपले कर्तव्य व जबाबादारी यांची जाणीव आहे. ती आपल्या गैरहजेरीत तुकाराम पूर्ण गोसावी होतील, विठ्ठलाच्या नादात त्याना जेवायची, पाणीही प्यायची शुद्ध राहणार नाही याची खात्री आहे. म्हणून ती आप्पाजीना तुकारामांच्या काळजीमुळे व आप्ल्यावरील जबाबदारीची जाणीव असल्यामुळे नकार देताना दिसते.

कादंबरीत अनेक प्रसंगातून ती पापभीरू, देवभोळ्या तुकारामांना क्रियाशील करण्याचा प्रयत्न करते. पण तरीही तुकारामांना संसार असार वाटतो. विठ्ठलाच्या भक्तीचो आस लागते. हे तिच्या लक्षात आल्यापासून ती स्वत: क्रियाशील बनतान दिसते. लग्नापासून स्वत: राबते. दुसऱ्याच्या घरी शेर्णी, दुध विकते, दळण दळताना दिसते. यातून तिची संसारातील जिद्द, कष्टाळू या वृत्तीतून तिची जीवनोमी किती जबरदस्त आहे याचा प्रत्यय येतो.

सर्वसामान्यपणे संसार हा दोघांच्या मदतीने करावयाचा असतो. तडजोडीने, काटकसरीने करायवयाचा असतो. एकाने जोडायचा व एकाने मोडायचा नसतो. पण आवलीच्या संदर्भात असेच घडताना दिसते. तिला संसार एकाकी स्वबळावर करावा लागत आहे. तिला अपेक्षा फक्त मुलांना दोनवेळचे पोटभर अन्न मिळावे. यासाठी तिच्यातील आई धडपणारी पोरांच्या पोटात दोन घास पडावेत म्हणून जीवाचा आटापीटा करणारी कष्ट करणारी कुटुंबवत्सल्य आहे.

आवलीचा विवाह हा तुकारामांच्याबरोबर त्यांची पहिली पत्नी व एक मुलगा असताना झालेला आहे. पण याही परिस्थितीत ती त्यांचा संसार संभाळताना दिसते. त्यांची पत्नी दम्याच्या विकाराने आजारी असल्याने तिचा सांभाळ करणारी कर्तव्यनिष्ठ सेवाभावी वृत्तीची दिसून येते. तुकारामांची संसारातील निरसपणा, नाकर्तेपणा पाहून ती अस्वस्थ होते. पण तुकारामांना कुणी थोरामोठ्यांनी समजूतीच्या चार गोष्टी संगितल्या तर ते भानावर येऊन

संसारात लक्ष घालण्याचे किमान बोलतात. हे पाहून तिचे मन आनंदून जाते. ती आशावादी जीवन जगताना दिसते. तिची भूमिका सकारात्मक आहे. आप्पाजींनी तुकारामांना समजावल्यानंतर ते काही काम करण्याचे ठरवतात त्यावेळी आवली मनात मांडे खाते की,

''आता आपले दिवस पालटतील. त्या काळ्याचं गारूड मग आपोआपच कमी होईल. त्याचा नाद सुटेल आणि आपला सुखाचा संसार सुरू होईल. मी माझ्या परीनं बक्कळ कष्ट करीनं. दुधाचा रतीब घालीन. चार पैसे मिळतील पोरांच्या अंगावर धंड कापडं येतील.आई मंगळाई, ही सगळी तुझीच कृपा आहे.माझ्या या वेड्या नवऱ्याला अशीच चांगली बुद्धी दे.आई मंगळाई तुझं आमच्याकडं लक्ष असू दे. तुझी खणानारळानं ओटी भरीन''[९]

विठोबा हा अगदी सामान्यातला सामान्य माणसाचा देव आहे. तो प्रसन्न होतो. भक्तांवर माया करतो. परंतु लहानपणी ऐकलेल्या कथेकरी बुवाच्याकीर्तनातून ज्ञानोबा, चोखोबा व गोरा कुंभार यांच्या छळाविषयीच्या कथा व तसाच आपल्याही संसारातील छळ यांचा मेळ झाल्यामुळे तिला विठ्ठलाबद्दल तिटकारा,राग आहे. पण संकटकाळी ती श्रद्धाळू बनते. मंगळाई सारख्या स्त्री दैवताचे आभार मानते. कष्ट आणि श्रद्धा, त्याग याचां मेळ घालताना दिसते.

आवली वयाने, अनुभवाने लहान असाली तरी ती तत्वज्ञ वैचारिक, समानतेची मूल्य बाळगताना दिसते. तुकारामांनी सर्व सामान्य माणसांना वेदातील ज्ञान दिले. म्हणून नाराज होणाऱ्या ब्राह्मण वर्गाला ती जिज्ञासू वृत्तीने जाब विचारताना दिसते. वेदातील ज्ञान घेण्याचा अधिकार सर्वांनाच आहे.तो फक्त ब्राह्मणांना कुणी दिला? त्या गोष्टी आपण का करावयाच्या नाहीत? या तिच्या विचारामधून सर्वधर्मसमानतेची वृत्ती दिसून येते.

आवली जशी जिज्ञासू आहे तशीच ती व्यवहारी वृत्तीची आहे.आपल्या नवऱ्याने देवदेव करीत बसण्यापेक्षा, टाळ, चिपळ्या, विणा अंगा खांद्यावर घेण्यापेक्षा मुलांना हिशेब शिकवावा, व्यवहार शिकवावा, चार अक्षरे त्यांनी शिकावी. आपले हाल झाले तसे त्यांचे होऊ नये, त्यांचे कल्याण व्हावे. अशी अपेक्षा बाळगणारी आहे.यातून तिचे व्यवहाराचे महत्त्व व मुलांच्या भविष्याची चिंता प्रतित होते.

आवलीला मुलांच्या भविष्याची चिंता आहेच. संसारातील अनेक अडचणींवर ती चिंतित होताना दिसते. त्या चिंतेमुळेच ती तुकारामांवर संतापते. पण आपल्या संतापी स्वभावाचा पश्चाताप होतो. तो तिच्यातील प्रेमळ, भावनाशील स्वभावामुळे. बाळाजी सावकाराच्या शेतातील पिकाचे नुसान तुकारामांनी भरून द्यायचे ठरते. तेव्हा ते नुकसान कशाने द्यावे हा प्रश्न तिच्यासमोर आहे. हणून ती रागाने त्रागा करते, संतापते. तिचासंतापी अवतार पाहून शेजारील लोक जमा होतात तेव्हा ती स्वत:ला आवर घालून आपल्या जीवनाचे कंगोरे धिंडवडे पाहून लोकांना असूरी आनंद मिळतो. हे पाहून व तुकारामांविषयी कणव येऊन ती बघावयास आलेल्या लोकांना म्हणते.

''चलाऽऽ चला इथनं, इथं काय तमाशा मांडलाय काय? कोडगे मेले. नुसतं दुसऱ्याची मजा बघायला पाहिजे. चला चालते व्हा. आमचं आम्ही बघून घेऊ. काही नको चुकचुकायला मी मस्त समर्थ हाय माझ्या नवऱ्याची संसाराची आणि पोराबाळांची काळजी करायला. तुम्हाला नको चुकचुकायला. मी मस्त समर्थ हाय माझ्या नवऱ्याची, संसाराची आणि पोराबाळांची काळजी करायला. तुम्हाला नको घोर पडायला. चलाऽऽ चालायला लागा असू दे माझा नवरा येडा, पण तो माझा नवरा आहे. या आवलीचा...मी आणि तो काय ते बघून घेऊ कुणाला मध्ये पडायचं कारण नाही.जमले सगळे टोची मारायला. पण जोवर ही आवली जिवंत आहे तोवर माझ्या संसारावर मी कुणालाही टोची मारू देणार नाही. सांगून ठेवते.''[१०]

या तिच्या वक्तव्यातून कुणाच्याही सहानुभूतीची अपेक्षा न करणारी, करारी, जिद्दी, तुकारामांवर प्रेम करणारी, दोषांवर पांघरून घालणारी, नवऱ्याच्या प्रतिष्ठेची बूज राखणारी आहे. तुकारामांच्या संदर्भातीलप्रकट होणारी तिची विविध रूपे पाहिली की, तिचे स्त्रीत्व किती संपन्न आहे याचा प्रत्यय येतो.

कादंबरीतील आवली प्रयत्नांवर विश्वास ठेवणारी आहे. दैवावर भरोसा ठेऊन हातपाय गाळणारी नाही. म्हणूनच ती आपल्या आजारी मुलाला देवाचा धावा न करता औषधोपचार करताना दिसते.

आवलीची इच्छा म्हणजे आपला संसार सामान्य, चारचौघांसारखा असावा. आपली मुले सुखी, समाधानी असावीत. परंतु तुकाराम मात्र संसारासंदर्भात स्वस्थ होते. मात्र विठ्ठलाचे

दर्शन होत नाही. म्हणून अस्वस्थ होते. व्याकूळ होते. त्यांना विठ्ठलाच्या दिव्यदर्शनाची ओढ होती आणि ती पूर्ण होत नाही. म्हणून त्यांची तळमळ होती. त्यामुळेच त्यांचा उदासलेला चेहरा, पडलेली नजर अस्थिर असलेले चित्त, जेवणात नसलेले लक्ष बघून आपण तुकारामांना टाकून बोललो, आक्रस्ताळेपणा करतो. त्यामुळे ते दु:खी आहेत असे तिच्या मनाला वाटून आपण केलेल्या संतापाबद्दल पश्चाताप होताना दिसतो. तिच्या मनाच्या या बोचणीतून तिची क्षमाशीलवृत्ती दिसून येते.

तुकारामांचे विठ्ठलाकडे अधिक झुकणे, त्यांची निस्सीम भक्ती यामुळे त्यांची किर्ती वाढत गेलेली तसतसे ते घरापासून दूर जातात. त्यांची तगमग, मळमळ संपते ते पांडुरंगाशी एकातांत बोलतात. हे पाहून तिला वाटते, तुकाराम वेडे झालेत. या त्यांच्या वागण्याचा अर्थ आपल्या माहेरी पाहिलेल्या वेड्याशी लावते. कारण तो ही वेडा असाच असंबंध बोलत असे मात्र तो वेडाच्या भरात एक दिवस आत्महत्या करतो. ही भीती तिच्या मनात असल्यामुळे तुकारामांचे कल्पनेतील नसणं तिला अस्वस्थ करते. यावर उपाय म्हणून ती भिकंभटाकडून औषधोपचार करण्याचे ठरविते. याही काळात ती निरक्षर असली तरी विज्ञाननिष्ठ दिसून येते.

तुकाराम महाराजांनी धर्मपीठाचा कायदा मोडला आहे.वेदातील ज्ञान घेऊन ते सर्वसामान्य लोकांना देतात. यासाठी ब्राह्मण नाराज होऊन त्यांना दंड म्हणून त्यांनी लिहिलेल्या अभंगाच्या पोथ्या, पाण्यात बूडवाव्यात असा होतो. यावेळी ब्राह्मणशाहीच्या आरोपाने एकाकी, निराश झालेल्या तुकारामांना आधार देताना दिसते. त्यांच्या कष्टाची कदर करताना दिसते. पोथ्या पाण्यात टाकण्याचे फर्मान रामेश्वर भट करतो व त्यासाठी तो गुरवाला तुकारामांच्या घरी पाठवतो. त्याप्रसंगात आवली गुरवाला म्हणते,

''आग लागो त्या रामेश्वर भटाला पाटीभर शेण देजा त्याला. पोथ्या मागतोय मेला, त्या लिहिताना माझ्या नवऱ्यानं ना माझी काळजी केली,ना पोराबाळांची. रगत आटवलंय त्यांनी या पोथ्या लिहिण्यासाठी. उपाशी-तापाशी राहून लिहिल्यात आणि म्हणं पाण्यात टाकायच्यात. चल आधी चालता हो इथून. जातोस का आता ओतू शेणाची पाटी डोक्यावर?''[११]

धर्ममार्तंडानी पोथ्या पाण्यात सोडल्यानंतर तुकाराम घायाळ होतात. त्यावेळी ती एक पत्नी आहेच, पण तुकारामांना ती माता होऊन सांभाळताना दिसते. आधार देताना दिसते. तर



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

काही दिवसांनी पोथ्या सापडल्यानंतर तिला तुकारामांइतकाच आनंद होताना दिसतो. यातून तिचा भाबडेपणा दिसून येतो. तिला तुकारामांच्या मोठेपणाविषयी वृथा अभिमान असल्याचे दिसून येते.

कादंबरीत अनेकवेळा विठ्ठल कोणत्या ना कोणत्या रूपात तुकारामांच्या भक्तीची परीक्षा घेताना दिसतो. विठ्ठलाने घेतलेले शिवाजीमहाराजांचे रूप आणि त्यांनी तुकारामांच्या कुटुंबाला दिलेला नजराणा तुकाराम निर्लोभीवृत्तीने परत करतात यावेळी निराश आवलीला परमेश्वराने केलेल्या थट्टेचा संताप अनावर होऊन ती आत्महत्या करावयास जाते. पण त्याही ठिकाणी विठ्ठल स्वामीच्या रूपात प्रकट होऊन आवलीची अनेक रूपे व तिची संसारातील यापुढील कर्तव्य यांची जाणीव करून देतात. त्यावेळी तिची जिज्ञासूवृत्ती जागृत होताना दिसते ती पती, मुले संसार यांच्या काळजीखातर परत येते. तिला आपल्या भ्याड वृत्तीचा पश्चाताप होऊन आपल्या आप्पाजींचे आपल्याविषयीची मत आठवते आप्पाजी म्हणाले होते, ''आवले, रामाच्या बरोबरीने वनवास सोसला, त्रास भोगला म्हणून सारं जग सीतामाईला रामाची सीता म्हणून ओळखंत. तुकारामांच्याबरोबर संसार करताना तुझी त्यांना अशी साथ मिळू दे की, जगानं तुला 'तुकयाची आवली' म्हणून ओळखाव आणि मला खात्री आहे की, तुही तुकारामांना तशीच साथ देशील आणि तुकयाची आवली म्हणून ओळखली जाशील''[१२]

आप्पाजी आपले आप्पाजी! त्यांना किती अभिमान होता आपला. आपल्या हुशारीचा, चुणचुणीतपणाचा, धडपड्या स्वभावाचा म्हणायचे, ''माझी आवली गप्प बसणारी, मुळूमुळू रडणारी नाहीच. कोणत्याही प्रसंगाला धैर्याने तोंड देणारी आहे. संकटाना सामोरं जाणारी आहे. माझ्या आवलीला कुठलही काम सांगा, नेटकेपणानं आणि सुबकपणानं करेल''[१३] (पृष्ठ क्र. १५३)

तुकारामांच्या जीवनात त्यांची आधारशीला बनताना प्रसंगानुरूप डोळे काढत असली तरी अलिकडे तुकारामांचे संसारातील कमी होत चाललेले अस्तित्व आणि निर्वाणीची भाषा पाहून त्यांचा मनाचा कल पाहून त्यांची मनोवस्था जाणून घेणारी आहे. म्हणून त्याची सावली बनताना दिसते. त्यांच्या वर बारीक लक्ष ठेऊन त्यांच्या नसलेपणास, अस्वस्थ होताना दिसते. त्यासाठी ती तुकारामांना पंढरपूरला जाण्यास विरोध करते. तर पंढरपूरहून घरी परतलेल्या

तुकारामांची ती भरलेल्या मनाने चौकशी करताना दिसते. त्यांची व विठ्ठलाची भेट झाली नाही म्हणून तुकारामांना समजावताना दिसते.

तुकाराम पंढरपूरला गेल्यानंतर आवलीच्या आजारपणात ज्या पंढरीनाथाने तिची सेवा केली त्या पंढरीनाथाला सेवेच्या मोबदल्यात आपले लेकरू मानून कृतज्ञपणे मायेची गोधडी देताना दिसते.

तुकारामांना पंढरपूरात विठ्ठल भेटला नाही. म्हणून उदास, दु:खी, ग्लान चेहरा करून बसलेल्या तुकारामांना ती समजावते. ती म्हणते, ''पोराबाळांनी भरलेल्या या गोकुळासारख्या घरात असं वाईट वंगाळ बोलू नये.''[१४] यातून तिची आज्ञापकाची भूमिका दिसून येते. तुकाराम महाराज आपल्या संसारात राब राब राबलेल्या आवलीला आपल्या शेवटच्या क्षणी आपल्यासोबत येण्यास विनंती करतात त्यावेळी संसारदक्ष, कुटुबवत्सल्य आवली मुलांना सोडून पोटातल्या गर्भाला जन्म देण्याच्या कर्तव्याची आठवण ठेऊन, तुकारामांना नम्रपणे नकार देताना दिसते. तर तुकाराम गेल्यानंतर तिला झोपेत पडलेले स्वप्न, आणि जागी होऊन तिला तुकारामांच्या शरीरापासून वेगळ्या झालेल्या टाळ-चिपळ्या पाहून आपल्या स्वप्नाचा तार्किकपणे अर्थ लावताना दिसते. तुकारामांच्या मृत्यूनंतर त्यांच्या आठवणी उराशी बाळगून जीवन जगणारी आवली संवेदनशील वृत्तीची आहे.

समारोप

अशाप्रकारे बालपणापासून सुसंस्कारशील असणारी तुकारामांच्या शेवटच्या क्षणापर्यंत प्रत्येक क्षणात, प्रत्येक संकटात परिवर्तनात भागीदारी करणारी एक पत्नी, एक आई, गृहिणी म्हणून भूमिका बजावताना तिच्या स्वभावातील परोपकारी वृत्ती सेवाभावी, श्रद्धाळू , कामसू, कष्टाळू, कर्तव्यनिष्ठ, कुटुंबवत्सल स्पष्ट व परखडपणा,परिस्थितीची जाणीव असणारी स्वाभिमानी, भाबडी पण प्रयत्नावर विश्वास असणारी एखाद्या पहाडाप्रमाणे भक्कम उभी राहून आपला संसार जपणाऱ्या स्त्रीच्या आवलीच्या स्वभावातील वैविध्य पूर्ण स्वभाव वैशिष्ट्याचे स्वरूप मंजुश्री गोखले यांनी चित्रित केले आहे.

## तुकाराम

वारकरी संप्रदायाचे कलश म्हणून वंदनीय ठरलेल्या संत तुकाराम महाराज त्यांच्या पराकोटीच्या विठ्ठलभक्तीने सामान्य साधकापासून परमेश्वराच्या साक्षात्कारापर्यंतच्या जीवनप्रवासातील त्यांचे स्वभाववैशिष्ट्ये मंजुश्री गोखले यांनी प्रभावीरित्या मांडले आहे.

संत परंपरेतील घराण्यातील जन्म झाल्याने भक्तीचे वेड असणारे बोल्होबा आणि कनकाई यांच्या संस्कारामुळे त्यांचे आचार-विचार आणि स्वच्छता हा त्यांच्या स्वभावातील महनीय विशेष आहे. तुकाराम लहान वयाचे असताना वडिलांचे वार्धक्य आणि संसाराची जबाबदारी समजूतदारपणाने स्वत:कडे घेताना दिसतात. ते संसारी आणि कुटुंबवत्सल आहेत. म्हणूनच एक व्यवहारदक्ष आणि प्रापंचिक सद्गृहस्थाची प्रतिभा त्यांच्या ठायी दिसून येते.

सुरूवातीला सुखी, आनंदी असणारे तुकाराम जीवनातील विलक्षण अशा घटनांनी उन्मळून पडतात. त्या घटनांमुळे सालस, पापभीरू तुकाराम विठ्ठलाच्या नामस्मरणात स्वत:ला झोकून देतात. त्यामुळे त्यांच्या जीवनाला वेगळी कलाटणी लागल्याने व प्रचंड मानसिक ताण आल्याने ते संसारापासून लांब जाताना दिसतात.

तुकारामांचे पहिले लग्न झालेले आहे. पण पत्नी रखुमाई दम्याच्या विकाराने आजारी असल्याने व एक मुलगा संताजी यांच्या प्रेमाखातर ते दुसऱ्या लग्नाला नकार देतात. पण केवळ पत्नीच्या आग्रह आणि मुलाची काळजी यासाठी ते होकार देतात. त्याचे दुसऱ्या पत्नीवर आवलीवर ही अत्यंत प्रेम असल्याचे दिसून येते.

तुकारामांच्या लग्नानंतर फारच थोड्या दिवसात बोल्होबा व पाठोपाठ कनकाईचा मृत्यू होतो. या घटनेने तुकारामांच्या मनावर प्रचंड आघात होते. अगोदरच मोठा भाऊ परागंदा झालेला भावजयीचा मृत्यू, या दु:खमय घटनांनी तुकाराम हादरून जातात. हे घाव पचविताना त्यांना जड जाते.परंतु त्यांची दुसरी पत्नी आवली हिच्या साथीने पुन्हा संसारात उभे राहतात. त्यांच्या जीवनात दु:खाची मालिका सुरू असताना अकल्पित असे अनेक बरेवाईट प्रसंग त्यांच्या जीवनात घडून येतात. महाराष्ट्रात पडलेला महा भयंकर दुष्काळ, त्यामुळे अनेक माणसे अन्न पाण्यावाचून मरताना पाहिली, व्यापार बसला, त्यांचा लाडका मुलगा संताजी या दुष्काळाचा बळी ठरला. पाठोपाठ झालेल्या संकटाच्या तडाख्याने संघर्षापासून दूर राहणारे तुकाराम हतबल, निराश, निष्क्रीय होताना दिसतात व विठ्ठल भक्तीत रममान होताना



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

दिसतात. यातून त्यांचा भोळसट, पापभीरू पणा दिसून येतो. त्यांच्या विठ्ठल भक्तीच्या निश्चयाने त्यांच्या निश्चयी स्वभावाचे दर्शन होते. संसारातील पत्नीची खंबीर साथ, विठ्ठलभक्तीचे वेड त्यामुळे भौतिक संसाराची कास सोडलेल्या तुकारामांचे आपल्या कुटुंबावर प्रेम आहे. म्हणूनच ते दुष्काळात मुलांची उपासमार होऊ नये म्हणून वाड्याच्या बदल्यात लालजी सावकाराकडून धान्य आणताना दिसतात. मात्र जप्तीच्या प्रसंगात लालजी सावकराला वाडा देतात. यातून त्यांची कृतज्ञता, क्षमाशील वृत्ती, निर्लोभिवृत्ती दिसून येते.

वाड्यावर जप्ती येताना आवली तुकारामांना आपला वाडा वाचविण्यास विनंती करते तेव्हा तुकाराम आवलीची समजूत काढताना म्हणतात, ''आवले, अग वेळोवेळी सावकारांकडून आपण पैशाची उचल केली आहे. मग आपण त्यापैशाची परतफेड करायला नको का? अग त्यांनी आपल्याला मदत केलीय मग आपण कृतघ्न होऊन कसं चालेल? चल, चल लवकर, तुझं किडूक-मिडूक काय असेल ते घे. तुझी पोरं घे आणि बाहेर पड. पांडुरंगाच्या मंदिरात जाऊन बसं अग त्याला आपली काळजी आहे. त्याच्यावर राग धरू नको. चल लवकर''[१५]

यातून त्यांची समजूतदारवृत्ती, व्यवहारी वृत्ती व परमेश्वरावरील अढळ श्रद्धेचे दर्शन होते.

आवलीला भेटायला आलेले आप्पाजी दुष्काळात झालेल्या तुकारामांच्या कुटुंबाची वाताहात आणि त्यावर उपाय म्हणून आपल्या वयाच्या, अनुभवाच्या आधाराने तुकारामांना समजावतात त्यावेळी तुकाराम आप्पाजींना म्हणतात, ''आप्पाजी खरं आहे तुमचं! [illegible] ही जबाबदारी टाळून चालणार नाही. ते माझं कर्तव्यच आहे.ते मला झेललंच पाहिजे. आप्पाजी, मी तुम्हाला शब्द देतो की, माझ्यापरीनं मी प्रपंच नीटनेटका करायला जास्तीत जास्त प्रयत्न करीन. फक्त मला काही वेळ द्या, या पोरांच्या मीठ-भाकरीसाठी तरी मी कुठतरी काम करीन. आप्पाजी मला कळत नाही. सांगणार, मार्ग दाखवणारं कुणी वडिलधारं माणूस उरल नाही. मी भरकटलो होतो. पण आता मी स्वत:ला सुधारेन त्यासाठी नक्की प्रयत्न करेन.''[१६]

यातून त्यांच्या आज्ञाधारकपणा, कष्टाळूवृत्ती, कर्तव्याची जाणीव प्रेमळ वृत्ती दिसून येते.

आपल्या कुटुंबासाठी काम मागावयास तुकाराम गावातील बाळाजी शेतकऱ्यांकडे जातात. बाळाजीला तुकारामांच्या सज्जन, पापभीरू, प्रामाणिकपणा बद्दल खात्री होती. ते त्यांना काम देतात. मुलांच्यासाठी त्यांना उसाची मोळी देतात. परंतु ते विठ्ठलाच्या नामस्मरणात गुंग असताना गावातील मुलांना ऊस वाटून टाकतात. यातून त्यांची परोपकारी वृत्ती, दयाळूपणा हे गुण दिसून येतात. बाळाजीच्या शेतातील राखण करताना त्यांच्या शेतातील पीक जनावरे तुडवून टाकतात. पण त्याबद्दल त्यांना पश्चाताप होत नाही. कारण ते प्राणीमात्रावर दया करणारे भूतदयावादी आहेत.

तुकारामांच्या काळात वेदांचं वाचन, अध्ययन आणि अध्यापन करण्याचा अधिकार फक्त ब्राह्मण समाजाला होता. तो धर्मपीठाचा कायदा होता. पण तो कायदा होता. पण तो कायदा मोडून तुकारामांनी बहुजन समाजाला आपल्या भजन किर्तनातून, ओवी अभंगातून वेदातील आपल्या भजन -किर्तनातून, ओवी-अभंगातून वेदातील ज्ञान शिकवलं समजावलं यातून त्यांची समाजसुधारणेच्या व्यासंगी वृत्तीचे दर्शन घडते.

धर्मपीटाचा कायदा मोडला म्हणून त्यांना शिक्षा म्हणून त्यांच्या अभंगाच्या पोथ्या पाण्यात सोडतात. त्यावेळी तुकाराम रामेश्वर भटाच्या अंगाला दाह होतो. त्यावेळी तुकाराम रामेश्वर भटाच्या अंगाला इंद्रायणीतील ओली माती लावून त्याचा दाह कमी करतात. यातून त्यांची सेवाभावी, क्षमाशील वृत्ती दिसून येते. तसेच वीस दिवसांनी सापडलेल्या पोथ्या आणि आपल्या पोथ्या सापडल्या म्हणून आनंदून जाणारी भोळी, भाबडी आवली पाहून भावूक होतात.

संत तुकाराम महाराज आणि शिवाजी महाराज यांच्या भेटीच्या प्रसंगात शिवाजी महाराज तुकारामांच्या कुटुंबासाठी मौल्यवान वस्तूचा नजराणा आणतात पण तुकाराम त्या भेटीचा स्वीकार करीत नाहीत. ते शिवाजी महाराजांना म्हणतात.

''हे सगळं परत घेऊन जा आणि राज्य रक्षणासाठी आणि रयतेच्या कल्याणासाठी त्याचा उपयाग करा. सोनं-चांदी आणि माती याचं मोल आमच्या लेखी एकच आहे. तेव्हा हे सगळ घेऊन जा !''[१७]

उपरोक्त वाक्यांवरून तुकाराम महाराज निरपेक्ष वृत्तीचे समाजाभिमुख वृत्तीचे दिसून येतात.

तुकाराम महाराजांचे संसारातीलदुर्लक्ष आणि पाठलाग करणारे दारिद्र्य यामुळे पिचलेली, त्रासलेली आवली जेव्हा आत्महत्या करावयास जाते तेव्हा तुकाराम तिची आपल्या जीवनातील अनेक रूपे आठवून दु:खी होऊन प्रसंगी रडतात. यातून त्यांचा कनवाळू पणा तसेच पंढरपूरला गेल्यानंतर आवलीचे आजारपण, विठ्ठलाचे दर्शन न होणे या घटनेने ते विमनस्क होऊन रडतात. त्यातून त्यांचे पत्नीवरील प्रेम व विठ्ठलावरील श्रद्धा अधिक गोचर होताना दिसते.

**समारोप**

अशाप्रकारे आपल्या भक्तीनं, अभंगवाणीनं, विद्वतेने, संतपदाच्या शिरोमणीपदावर पोहोचलेले संत तुकाराम सालस, पापभीरू, देवभोळे, कुटुंबवत्सल, प्रेमळ, समंजस व भावकू, भूतदयावादी, कृतज्ञ, क्षमाशील वृत्तीचे असल्याचे दिसून येते.

आप्पाजी

आवलीचे वडील म्हणजे आप्पाजी हे पुण्यातील एक चांगले सदगृहस्थ आहेत. ते प्रामाणिकपणे व्यापार करून नेटका संसार करून चार पैसे गाठीशी राखून असलेले एक सज्जन प्रतिष्ठित माणूस म्हूणन त्यांची किर्ती आहे. ते कुटुंबवत्सल्य आहेत. हे आवलीवरील त्यांच्या प्रेमातून दिसून येते. त्यांच्याकडे गावातील लोक अडचण कोणतीही असो सल्ला मागण्यासाठी त्यांच्याकडे येतात. यावरून ते उत्तम मार्गदर्शक वृत्तीचे आहेत.सामान्य लोकांच्या संसारातील बारीक-सारीक गोष्टींकडे लक्ष देणारे त्यांचा आदरातिथ्य करणारे आहेत.

गावातील सारजा आपला नवरा संसार सोडून पंढरपूरला विठ्ठलाची भक्ती करण्यसाठी कायमचा निघून गेला आहे असे गाऱ्हाणे ती आप्पाजी समोर मांडते. तेव्हा आप्पाजी सारजाला समजावताना म्हणतात, ‘‘आता काय करावं या राऊला?असं संसार टाकून कुणी देवाची भक्ती केली होती कधी ? सारजा, तू काळजी करू नको. मी रावजीला सांगावा धाडतो त्याला बोलावून घेतो आणि चार समजुतीच्या गोष्टी सांगतो. तो ऐकेल माझं नाहीच ऐकलं तर कान धरून संसाराला उभा करतो तू रडू नको, जा आता घरी जा पोरं उपाशी असतील. आवलीच्या आई, ऐकल का? तिला पासरीभर धान्य द्या. जा सारजाक्का, जा घरी तू काळजी करू नको. जा आता, मी बघतो काय करायचं ते.’’[१८]

एखाद्याच्या हातून थोडीशी चूक झाली तर ते रागावणारे परंतु लगेच समजावून सांगणारे, कधी प्रेमाने, तर संतापात शिव्या ही देणारे आहेत. पंढरपूरला गेलेल्या राऊला भक्ती करता यावी म्हणून गावातील विठ्ठलाच्या मंदिरात भक्ती करण्याची परवानगी देतात. असे हे आप्पाजी कनवाळू वृत्तीचे आहेत.

संपूर्ण गावाला सल्ला देणारे आप्पाजी एखाद्या मोठ्या प्रसंगात आपल्यापेक्षाही वयाने अनुभवाने मोठ्या असणाऱ्या व्यक्तिंचा कधी कधी सल्ला घेताना दिसता. यातून त्यांच्या दुसऱ्याला आदर सन्मान करण्याची वृत्ती दिसून येते.

आप्पाजी आपल्या लाडक्या मुलीचे लग्न देहूचे बोल्होबा आंबिले -मोरे यांचा मुलगा तुकाराम यांच्याशी करतात. तुकाराम हे विवाहित, एका मुलाचे बाप आहेत. पण या घरात आपली आवली सुखी होईल असा त्यांना विश्वास आहे. ते आपल्यापेक्षा आपल्या मुलीचे सुख कशात आहे हे जाणणारे आहेत. आवलीचे लग्न झाल्यानंतर आवली आपल्याला दुरावणार या विचाराने त्यांचे मन गहिवरून येते. येथै त्यांचे वात्सल्यपूर्ण पितृप्रेम दिसून येते. आवलीच्या लग्नात सहभागी झालेले गावकरी मंडळी पाहून आप्पाजींचा गावावरील लोभ, आपूलकीपणा व दिलदारवृत्तीचे दर्शन होते.

आवलीचे लग्न झाल्यानंतर ते बऱ्याच दिवसांनी आवलीला भेटायला जातात. ते वारंवार जाताना दिसत नाहीत. कारण तुकारामांच्या घरी आपली मुलगी सुखी असेल असे त्यांना मनोमन वाटत होते. पण मध्यंतरीच्या दु:खद आणि अकल्पित वाईट घटनांनी आवली-तुकारामांच्या कुटुंबाची झालेली वाताहत पाहून त्यांना प्रचंड धक्का बसतो. त्यांच्या काळजाच्या चिंधड्या होतात. पण स्वत:ला सावरून दुसऱ्याला आधार देणे हा त्यांचा स्वभाव आहे. त्यामुळे ते आवलीला आधार देताना दिसतात. आवलीने संकटातून सावरण्यासाठी आप्पाजी आपल्या मुलीला म्हणतात.

''आवले, पोरी आता अजिबात रडायचं नाही. एकदम शांत हो बघू हे घे पाणी, पी जरा बरं वाटेल आणि आता डोळ्यातनं अजिबात पाणी काढायचं नाही. बरं का रे पोरांनो, अरे माझी आवली अशी मुळुमुळु रडणारी नव्हती, एकदम तेज होती. होय किनई आवले?''[१९]

आप्पाजी प्रयत्नवादी आहेत. म्हणूनच संकआने हतबल झालेल्या तुकारामांची समजून काढताना म्हणतात.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

''जावईबापू, तुम्हाला काही चार गोष्टी वयाच्या अनुभवाच्या आधारानं आणि अधिकारानं सांगीन म्हणतो राग मानू नका, पण आतापर्यंत जे झालं ते देवाची मर्जी होती. देवाचा तडाखा होता आणि त्याच्या मर्जीपुढं कुणाचं काही चालत नाही. पण आता इथून पुढं तरी आपल्या बायकोचं, पोराबाळांच पोट पाणी बघणं हे तुमचं पहिल काम आहे. अहो देव असतोच की! तो काय देवळातनं पळून जातोय होय? तुमच्या वडिलानी विठ्ठलाची भक्ती केलीच की, पण त्यांनी प्रपंचही चांगला केला. जावईबापू माझी आवली गुणी पोरं आहे. फटकळ आहे थोडी, पण मनाची निर्मळ आहे. तिला तुमच्याकडनं सोन्या-नाण्याची अपेक्षा नाहीय. शेती-वाडीची अपेक्षा नाही. पण पोरांच्या पोटात चार घास रोज पडावेत आणि अंग झाकण्यापुरती तरी कपडे त्यांना मिळावेत एवढीच तिची इच्छा आहे. ती कोंड्याचा मांडा करेल आणि काडी-कडब्यातनं पण संसार करेल पण जावईबापू, तुम्हीही थोडसं संसारात लक्ष घाला आणि मग काय तुम्हाला पांडुरंगाची भक्ती करायची ती करा.''[२०]

यावरून आप्पाजी हे संसारातील कर्तव्याची जाणीव असणारे, कनवाळू, सहनशील वृत्तीचे, संयमी स्वभावाचे होते हे प्रत्ययास येते.

**बोल्होबा**

संत तुकारामांचे वडील बोल्होबा हे देहूतील धार्मिक वृत्तीचे, विठ्ठलाचे पाईक, सज्जन गृहस्थ आहेत. ते प्रामाणिक, सरळ मनाचे असल्यामुळे अखंड पंच-क्रोशीत त्यांना मान, प्रतिष्ठा असणारे आहेत. ते परोपकारी वृत्तीचे आहेत. निराधार सईला ते वडिलांप्रमाणे माया देऊन तिचा सांभाळ करणारे आहेत. ते निष्ठावान, व्यवहारी असे सद्गृहस्थ आहेत. सहिष्णूतावादी असणारे बोल्होबा, घरी नेहमीच कुणी ना कुणी वारकरी, किर्तनकार, किंवा साधू संन्याशी पंगतीला बोलावून त्यांचे आदरातिथ्य करणारे आहेत. यातून त्यांच्या उदार व दिलदार वृत्तीचे दर्शन घडून येते. आपल्या मुलांचा अर्धवट संसार सुखी व्हावा, यासाठी ते धडपडणारे आहेत. त्यासाठी ते आप्पाजी गुळवे यांची मुलगी आवली हिच्याशी तुकारामांचे दुसरे लग्न करतात. कारण आवली तुकारामांचा संसार योग्यरित्या सांभाळील याची जाणीव त्यांच्या व्यवहारी मनाला पटली असल्याने ते असा निर्णय घेतात. यातून त्यांची चौकस वृत्ती व विश्वासू वृत्ती दिसून येते. आवलीला ते मुलीप्रमाणे माया, प्रेम देणारे आहेत.

बोल्होबा गावच्या समाजकारणात अग्रक्रमाने भाग घेणारे, गावाचे हित जपणारे, दुसऱ्याच्या उपयोगी पडून त्यांचे भले करणारे आहेत. सईला काळी आहे. म्हणून टाकलेल्या माणकूची समजूत काढण्यासाठी आवली बोल्होबांकडे परवानगी मागते तेव्हा बोल्होबा आवलीला म्हणतात,

''जरूर करा, सूनबाई जरूर प्रयत्न करा, त्यापोरीचं सईचं, कुणकडनं तरी कल्याण झालं म्हणजे झालं''[२१]

बोल्होबा हे संसार करून विठ्ठलाचे निश्चित मनाने नामस्मरण करणारे कर्तृत्वानं, कुटुंबवत्सल वृत्तीचे दिसून येतात.

राऊ

राऊ हा पुण्यातील एक सामान्य जीवन जगणारा माणूस आहे. पण त्याला संसाराबद्दल कंटाळा आहे. तो संसारापेक्षा विठ्ठलाची भक्ती अधिक करणारा आहे. त्यासाठी तो आपल्या पत्नीला सारजाला परखड शब्दात आपण संसार न करण्याबद्दल सांगणारा आहे. पण आप्पाजी सारखी प्रतिष्ठित माणसे जेव्हा समजूत काढतात. तेव्हा तो अदबीने वागणारा आहे. तो निर्मळ मनाचा आहे.

आप्पाजी जेव्हा राऊला मुल संसार याविषयी समजावून सांगतात त्यावेळी आप्पाजींना राऊ म्हणतो.

''आप्पाजी मला पंढरपूरला लई राहावसं वाटतं मला त्यापांडुरंगाची भक्ती करावीशी वाटतीया. त्याच नाव घ्यावं, त्याची पूजा करावी, त्याच्याकडे बघत बसावं असं मला वाटतं आप्पाजी मी गुरव आहे. आमच्या घरात देवाच्या नैवद्याचा मान आहे. पण माझं मन तेवढ्यानं भरत नाही. मला नुसती पांडुरंगाची भक्ती करावीशी वाटते आणि संसारात राहून ते शक्य नाही. म्हणून मी निघून गेलो. आता मी कायमचा पंढरपूरला जाऊन राहणार हितं माझ मन रमत नाही. मी पंढरपूरला जाणार माझ्या पांडुरंगाकडं''[२२]

यावरून त्याची विठ्ठलावरील श्रद्धा, भक्ती प्रतित होते. त्याच्या मनमोकळ्या व प्रांजळ स्वभावाचे दर्शन होते.

### माणकू

'तुकयाची आवली' या कादंबरीत रेखाटले गेलेले आणखी एक व्यक्तिचित्र म्हणजे माणकू, तो थोडासा हट्टी स्वभावाचा पण देवभोळा, विठ्ठभक्त, श्रद्धाळू, कामसू, मेहनती, प्रामाणिक असा आहे. विठ्ठलाची भजने गोड गळ्याने आणि तल्लीनतेने गात बसणे हा त्याचा छंद आहे. त्याला काळ्या रंगाबद्दल मनात तिटकारा आहे. म्हणून तो आपल्या बायकोला सईला तिच्या काळ्या रंगाबद्दल नांदवून घेण्यास नकार देताना दिसतो. तो मनातली खळखळ स्पष्टपणे बोलणारा आहे.

आवलीने जेव्हा माणकूला विठ्ठलाचा काळारंग आणि सईचा काळा रंग एकच असल्याने काळ्या रंगाच्या विठ्ठलाची भजन आणि पूजा करू नये, दर्शन घेऊ नये. असा सल्ला दिल्यावर तो गडबडून जाऊन माफी मागतो यातून त्याचा पापभीरूपणा सिद्ध होतो. माणकू उदारवृत्तीचा आहे. तुकारामांचा वाडा जप्त झाला तेव्हा तो तुकारामांच्या कुटुंबासाठी आपली मदत म्हणून शेतातील घर राहण्यासाठी देतो. यातून त्याचा संकटकाळी दुसऱ्याला मदत करणे स्वभाव गुण दिसून येतो. . तो परोपकारी सेवाभावी वृत्तीचा आहे.

### लालजी सावकार

लालजी सावकाराचा स्वभाव लालची आहे. त्याची वृत्ती सावकारी पाशाची आहे. नडलेल्या गरीब लोकांना अमाप कर्जे देणे आणि निष्ठूरपणे त्यांच्या मालमत्तेवर जप्ती आणणे हा त्याचा स्वभाव आहे. त्याच्या मनात दयाभाव निर्माण होताना दिसत नाही. तो अव्यवहारी वृत्तीचा आहे. आवलीसारखी एक गरीब, पिचलेली स्त्री वाड्याच्या जप्तीच्या प्रसंगात आपली मुलं उघड्यावर पडतील म्हणून आकांताने गयावया करते पण त्याच्या पाषाणहृदयाला पाझर फुटताना दिसत नाही. यातून त्याच्या निष्ठूर, माणूसकीहीन वृत्तीचे दर्शन होते.

### बाळाजी

बाळाजी हा देहूतील एक सदन शेतकरी आहे.तो समोरच्या व्यक्तीची आपुलकीने चौकशी करणारा, कनवाळू वृत्तीचा आहे. प्रामाणिक, कष्ठाळू व्यक्तींबद्दल त्याच्या मनात आदरभाव आहे.तो विश्वासू आहे. म्हणूनच तुकारामांना आपले शेत राखणीचे काम देऊन मदत करताना दिसतो. पण तुकाराम विठ्ठलाच्या नामस्मरणात गुंतल्यावर जनावरे शेतातील पीक तुडवून टाकतात. तेव्हा बाळाजीच्या पिकाचे नुकसान तुकारामांनी भरून द्यावे असा

निर्णय होतो. बाळाजीला नेहमीपेक्षा एक खंडी धान्य जास्त होते. त्यावेळी बाळाजी आपल्या शेतात जादा झालेले धान्य तुकारामांना देतात यातून बाळाजींच्या उदार व दिलदार वृत्तीचे दर्शन घडते.

**रामेश्वर भट**

रामेश्वर भट हा काशीचा धर्म पंडित आहे. त्याचा स्वभाव सनातनी, धर्ममार्तंड आहे. वेदातील ज्ञान फक्त ब्राह्मण लोकांनी घ्यायचे, ते सामान्यांसाठी नाही. असे त्याचे मत आहे. यातून त्याच्या ब्राह्मणशाहीच्या हुकुमशाहीच्या स्वभावाचा प्रत्यय येतो. वेदातील ज्ञान तुकारामांनी अभंग,भजन, किर्तनाच्या माध्यमातून दिले म्हणून त्याने तुकारामांच्या अभंगाच्या पोथ्या खुद्द तुकारामांना न्यायनिष्ठूरपणे पाण्यात सोडावयास लावल्या. यातून त्याच्या कडवट न्यायदानाचे दर्शन होते. तो गर्विष्ट आहे. आपल्या ब्राह्मणकीचा त्याला अभिमान आहे. पोथ्या बुडविल्यानंतर घायाळ तुकारामांना पाहून त्याला कुच्छित आनंद होताना दिसतो. यातून त्याच्या पक्षपाती,संकुचित वृत्तीचे दर्शन होते. तुकारामांचे श्रेष्ठत्व त्याला मान्य नसल्याने त्याची सूड घेण्याची भावना दिसून येते.

रामेश्वर भटाने तुकारामांच्या पोथ्या इंद्रायणीत सोडल्यानंतर त्याच्या अंगाचा अचानकपणे दाह होतो त्यावेळी तुकाराम त्याच्या मदतीला धावून येतात. त्याच्या अंगाला ओली माती लावून त्याचा दाह कमी करतात. हे पाहून कुपमंडूक वृत्तीच्या रामेश्वर भटाला तुकारामांची योग्यता, श्रेष्ठता, पटते. तो नतमस्तक होऊनक्षमा मागतो. तुकारामांच्या ज्या पालखीत पोथ्या आहेत त्या पालखीला खांदा देणारा पण शेवटी आपले खुजेपण नाईलाजाने मान्य करणारा असा त्याचा स्वभाव  आहे.

**भिंकभट**

भिकंभट हा देहू येथील वैद्यकी हा व्यवसाय करणारा आहे. त्याच तुकारामांबद्दल चांगलं मत  नव्हते. पण तोआपल्या व्यवसायाशी एकनिष्ठ आहे. तो तुकारामांच्या आजारी मुलास औषध देतो. त्यातून त्यांची उदार व दिलदार निरपेक्ष वृत्ती दिसून येते. औषध देण्यासंदर्भात त्यांच्या मनात कोणताही अहंभाव नाही.

तुकाराम जेव्हा भक्तीच्या वेडाने विठ्ठलांशी समाधीस्थ होऊन बोलायचे तेव्हा यावर उपाय म्हणून आवली म्हादयाला भिकंभटाकडे औषध आणावयास पाठवते पण यावेळी


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

भिकंभट औषध देण्याचे नाकारतो. कारण भिकंभटाला तुकारामांची भक्ती आणि योग्यता यांची महती कळली होती यावर औषघ हा उपचार नाही तर त्यांना त्यांची भक्ती करू देणे हाच उपाय आहे. अशा मताचे स्पष्टीकरण करतो. यातून त्याच्या समजूतदार, चौकस, तार्किक वृत्तीचे दर्शन घडून येते.

### आवलीची आई

'आवलीची आई' ही व्यक्तिरेखा कुटुंबवत्सल, मायाळू, कष्टाळू, संसारदक्ष अशी स्त्री आहे. लहानपणापासून मुलीच्या जातीला योग्य वळण असावे म्हणून ती आवलीला योग्य संस्कार देणारी आहे.रूसलेल्या आवलीचा रूसवा काढण्यासाठी आवलीची आई आवलीला म्हणते "शानी माझी बाई ती. तुझा राग गेला का? मुलीच्या जातीनं असं घडी घडी रागावू नये, रूसू नये चल वाढते चल"[२३] ती अदबीन वागणारी व तसेच संकार मुलीला देताना दिसते.

स्वच्छता व टापटीप हा तिच्या महत्त्वाचा गुण आहे. ती चौकसवृत्तीची आहे. म्हणूनच बोल्होबांच्या घरी गेल्यानंतर आवलीच्या सुखासाठी स्त्रीसुलभ भावनेने घर न्यायहाळताना दिसते. ती परोपकारी आहे. सगुणासारख्या निराधार स्त्रीला आधार देताना दिसते. घरी येणाऱ्या जाणाऱ्या लोकांचे ती आदरातिथ्य करते. यातून तिच्या मनाचा मोठेपणा सर्व सूचना पाळताना दिसते. आपल्या मुलीचे लग्न बिजवर तुकारामांशी होतयं यासाठी तिच्या मनात सल आहे पण तसे आपल्या पतीना परखडपणे बोलण्याचे धारिष्ठ्य तिच्या स्वभावात नाही.

आवली सास्री जाताना तिची अनेक रूपे आठवून ती अतिव मायेने भावनाशील होताना दिसते.

### कनकाई

कनकाई ही धार्मिक वृत्तीची आहे.ती शांत व संमजस आहे. तुकारामांचा संसार मार्गी लागावा म्हणून ती आवलीच्या आईला तुकारामांबद्दल सविस्तर माहिती सांगते. तिचा स्वभाव भाबडा आहे. तिने ठेवलेल्या घराच्या व्यवस्थेवरून तिचा नीटनेटकेपणा प्रतित होतो. ती प्रेमळ व परोपकारी आहे. आपल्या घरी पंगतीला रोज कुणी ना कुणी वारकरी आसावा वारकी नसलातर किर्तनकार किंवा साधू संन्याशी असावा हा बोल्होबांचा आपुलकीचा, माणूसकीचा

व्यवहार ती हसतमुखाने सांभाळते. सई सारख्या निराधार स्त्रीला प्रेम माया देऊन स्वत:च्या मुलीप्रमाणे सांभाळ करते.

आवली तुकारामांचा संसार समर्थपणे सांभाळील याचा तिला विश्वास आहे. ती आवलीला मुलीची माया देते. यातून तिचे प्रेमळ, कुटुंबवत्सल हे गुण निर्दिष्ठित होतात.

**रूक्मिणी**

तुकारामांची पहिली पत्नी रूक्मिणी ही तुकारामांवर प्रेम करणारी आहे. पण ती दम्याच्या विकाराने आजारी असल्याने आपण तुकारामांना आयुष्यभर साथ देऊ शकणार नाही याची जाणीव असल्याने ती तुकारामांना दुसरे लग्न करण्यास संमती देते.आपल्या पतीच्या व मुलांच्या भविष्याची चिंता करणारी आहे. तिला आवलीबद्दल फार मोठा विश्वासआहे. आपल्या पतीचा संसार ती समर्थपणे सांभाळेल याची तिला खात्री आहे. ती समंजस असल्याने आपल्या मुलाची जबाबदारी आवलीवर सोपवताना दिसते. ती शांत व संयमी समंजसवृत्तीची आहे.

**सई**

सई ही स्वभावाने गरीब परिस्थितीची जाणीव असणारी, बोल्होबांच्या घरी प्रामाणिकपणे पडेल ते काम आपलेपणानं करणारी एक निराधार स्त्री आहे.ती विवाहित आहे. पण केवळ काळी आहे म्हणून तिला नवऱ्याने टाकले आहे. ती कामसू आहे. बोल्होबा-कनकाईला आई वडिलांच्या ठिकाणी बघणारी आहे. त्याचं घर आपलं घर समजून पडेल ती कामे करणारी प्रेमळ, कुटुंबवत्सल आहे.

सईच्या एकाकी जीवनात आवलीने केलेला प्रयोग म्हणजे सईचा काळा रंग आणि विठ्ठलाचा काळा रंग एक आहे. तेव्हा काळा रंग न आवडणाऱ्या माणकूला काळ्या विठ्ठलाच्याही देवळात जाण्यास मनाई केल्यावर तो सईचा स्वीकार करतो व आवलीमुळे आपला संसार आपल्याला परत मिळाला हे पाहून सद्‌गदीत होताना दिसते. ती आवलीचे आभार मानते. यातून तिची कृतज्ञता दिसून येते. तिच्या ठिकाणी प्रेम, माया, जिव्हाळा, आत्मियता, संसाराविषयी ओढ या गोष्टीचे दर्शन होते.

### काशिबाई

काशिबाई ही आवलीची शेजारीण आहे. तुकारामांच्या विठ्ठल भक्ती विषयी तिच्या मनात आदराची भावना आहे. ती त्यांच्या भजन किर्तनाला जाते ती श्रद्धाळू आहे तसेच आवलीविषयी तिच्या मनात कणव आहे. तुकारामांनी किर्तनात आपल्या बायकोला कर्कशा म्हटले ही गोष्ट तिला खटकते. असे आपल्या बायकोला चार चौघांत म्हणून नये. असे तिचे मत आहे. तिच्या ठिकाणी स्त्रीसुलभ भावना आहे. आपल्या बायकोलाच काय पण इतर स्त्रीयांनाही असे जाहीरपणे काहीही बोलू नये, असे त्याकाळीही मत व्यक्त करणारी स्त्री दिसून येते.

### गुणाबाई

गुणाबाई ही आप्पाजींच्या घरी कामाला असली तरी तिच्या मनात दुजा भाव नाही. ती आपलच घर समजून घरी काम करणारी आहे. आवलीच्या प्रती तिला खूप प्रेम आहे. तिच्या असण्या बागडण्यात आपला एकलेपणा विसरणारी आहे. आवलीच्या आणि तिच्या वयात अंतर असले तरी ती आवलीच्या सर्व इच्छा, कोड कौतुक पुरविणारी प्रेमळ स्त्री आहे. आवलीची पाठराखीण म्हणून ती जाते. विठ्ठलाची भक्ती करणे, त्याचे अभंग गुणगुणने हे तिचे छंद आहेत. गुणाबाई  भावनाशील आहे. आप्पाजींच्या घरी रडत आलेल्या सारजाची स्त्री सुलभ भावनेने चौकशी करते.

दुसऱ्याला  मदत करणे, दुसऱ्याच्या भावना जाणून घेणे, इतरांवर प्रेम माया करणे हे तिच्या व्यक्तिमत्त्वातून दिसून येते.

### सारजाक्का

सारजा ही संसारदक्ष स्त्री आहे. आपला नवरा संसार सोडून पंढरपूरला गेला याबद्दल तिच्यामनात त्रागा आहे. त्यासाठी ती आप्पाजींचा सल्ला घेताना दिसते. यातून मोठ्याना मान, प्रतिष्ठा देण्याची तिची वृत्ती दिसून येते. ती कर्तव्यतनिष्ठ आहे. पतीचे संसार टाकून जाण्यानं अस्वस्थ होणारी कुटुंबवत्सल अशी भावनाशील स्त्री आहे.

### इतर व्यक्तिरेखा

तुकयाची आवली कादंबरीमध्ये येणारी इतर पात्रे क्वचित, प्रसंगानुरून येतात. काही पात्रे सालस, पापभीरू, श्रद्धाळू, भित्री अशी आहेत.सोपानकाका हे एक गावातील भले गृहस्थ

आहेत. पण गावाच्या विरोधात जाणारे नाहीत. त्यातून त्यांचा अलिप्तपणा, भिन्नेपणा व्यक्त होतो. त्यांना गावाबद्दल आदरयुक्त भिती आहे.

गावातील गुरव रामेश्वर भटाच्या आज्ञेखातर आवलीकडे पोथ्या मागतो. आवली त्याला त्रागा करून परत पाठवते.पण तो आवलीला प्रत्युत्तर देताना दिसत नाही. इंद्रायणीतील पोथ्या सापडल्यानंतर घायाळ तुकारामांच्या अवस्थेबद्दल कणव असणाऱ्यां गुरवाच्या मुलास आनंद होतो.खुद्द रामेश्वर भटाने तुकारामांचे पाय धरले हे सांगणारा सोपानकाकांचा बाळू तुकारामांचा मोठेपणा जाणून आहे.

आवलीची शेजारीण सुंदरामावशी आपला शेजारधर्म पाळते. ती आवलीच्या आजारपणात सेवा करते. तिच्या कुटुंबाला मदत करते.

आवलीची मोठी दोन मुले म्हादया आणि काशी यांना आपल्या आई-वडिलांच्या परिस्थितीची जाणीव आहे. ती आहे त्या परिस्थितीत सामावून घेतात. आपली लहान भांवडे गंगा, विठोबा, नारायण यांचा सांभाळ करणारी मायाळू भांवडे आहेत.

कादंबरीत प्रत्येक प्रकरणात येणारी व्यक्तिरेखा म्हणजे विठ्ठल. ती कर कटीवर ठेवलेली, स्थीर भाव मुद्रेची सामर्थ्यशाली मानवी रूपात प्रकट केले आहे विठ्ठल हे तुकारामांच्या भल्या -बुऱ्याचा विचार करणारे पात्र आहे. तुकारामांना लौकिक संसारापासून परावृत्त करून अलौकीकतेकडे नेणारे तुकारामांना महान विभुती बनवून आकाशाएवढं करण्यात यशस्वी ठरलेली व्यक्तिरेखा नकळतपणे रेखाटली आहे. तर रूक्मिणीची व्यक्तिरेखा विलोभनीय असे आहे. ती एक स्त्री म्हणून आवलीच्या परिस्थितीची जाणीव असल्याने ती नेहमी समर्थन करताना दिसते. ती नेहमी चिंता व्यक्त करणारी संभ्रमावस्थेत असणारी आहे

कादंबरीत लेखिकेने प्रत्यक्ष विठ्ठलाला स्वामीजी, शिवाजी महाराज,पंढरीनाथ यादव, विष्णू या नावाने व्यक्त केले आहे. तर काही इतर व्यक्तिरेखा या केवळ नामोल्लेखाने व्यक्त झाल्या आहेत. त्यामध्ये गंगा, विठोबा, छोटा नारायण, तुकारामांचा मुलगा, संताजी, तसेच भाऊ सावजी, त्याची पत्नी, शिवाजी महाराजांच्या भेटीतील पंत,सार्थीदार, शिपाई, आप्पाजींच्यापंचमंडळीतील बाळाजी कृष्णाजी यांचा केवळ उल्लेख होताना दिसतो.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## संदर्भ सूची


| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. उपाध्ये, बाबुराव | : | 'अक्षर वैदर्भी' सप्टें २००७ पृ. क्र. ३ |
| २. | डॉ. फडकुले, निर्मलकुमार | : | दै. सकाळ सोलापूर मंगळवार, १८ जून २००२ पृ. क्र. ६ |
| ३. | गोखले, मंजुश्री | : | 'तुकयाची आवली' मेहता पब्लिशिंग, हाऊस पुणे, प्रथमावृत्ती नोव्हें. २००७ पृष्ठ क्र. ७५ |
| ४. | तत्रैव | : | पृ.क्र. १४९. |
| ५. | तत्रैव | : | पृ.क्र.९७. |
| ६. | तत्रैव | : | पृ.क्र. ९८. |
| ७. | तत्रैव | : | पृ.क्र. १०४. |
| ८. | तत्रैव | : | पृ.क्र. ११२. |
| ९. | तत्रैव | : | पृ.क्र.११८. |
| १०. | तत्रैव | : | पृ.क्र. ११९ |
| ११. | तत्रैव | : | पृ.क्र.१३७ |
| १२. | तत्रैव | : | पृ.क्र. १५३. |
| १३. | तत्रैव | : | पृ.क्र. १५३. |
| १४. | तत्रैव | : | पृ.क्र. १७४. |
| १५. | तत्रैव | : | पृ.क्र. ९१. |
| १६. | तत्रैव | : | पृ.क्र. ११४. |
| १७. | तत्रैव | : | पृ.क्र. १४९. |
| १८. | तत्रैव | : | पृ.क्र. १२. |
| १९. | तत्रैव | : | पृ.क्र. १०९. |
| २०. | तत्रैव | : | पृ.क्र. ११४. |
| २१. | तत्रैव | : | पृ.क्र.७५. |
| २२. | तत्रैव | : | पृ.क्र. १६. |
| २३. | तत्रैव | : | पृ.क्र. ३७. |